। ब्राह्मण कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिच्या उन्नतीसाठी एक प्रभावी माध्यम ।

ॐ प्रकाशन

ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका

BRAHMAN BUSINESS JOURNAL

■ पुणे ■ जुलै २०१८ ■ वर्ष १४ - अंक ७ ■ किंमत रु. ५०/- ■ पृष्ठसंख्या ७२ ■ मुख्य संपादक : गोविंद हर्डीकर

Interact

# मनोरंजनातून गणिताकडे

## वैदिक गणित पद्धत : उत्तम यशाचा मार्ग!

**बाप रे गणित? नको रे बाबा.... शाळेत शिकतो तेवढं पुरे .... अशी तुमची अवस्था झाली असणार....**

**हो, पण जरा थांबा...तुम्ही समजता तसलं अवघड किचकट, कठीण नाही.**

**गणिताकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलवणारं, गणिताशी मैत्री करायला लावणारं, असं हे गणित आहे....**

**असं नक्की काय आहे या गणितात ते खालच्या प्रश्नोत्तरातून आपण पाहू या....मला नक्की खात्री आहे की तुम्हीसुद्धा हे गणित नक्कीच शिकाल... चला तर मग....गणिताच्या जादुई नगरीत...**

**प्र. : नक्की कसलं गणित म्हणायचं हे?**

**उत्तर :** हे आहे वैदिक गणित.....अथर्ववेदाच्या अध्ययनातून स्फुरलेलं असं हे गणित. वेदांच्या आधारातून जन्माला आलं म्हणून वैदिक गणित.



विजय कुलकर्णी
९६०४५५५१९३

**प्र. : मग नक्की काय आहे याच्यामधे आणि याची निर्मिती कुणी केली?**

**उत्तर :** गोवर्धनपुरीचे जगद्गुरू शंकराचार्य भारती श्रीकृष्णतीर्थ महाराज यांनी ९ वर्षे वेद अध्ययन व ध्यानसाधनेतून निर्माण केलेलं हे गणित. त्यांनी एकूण १६ प्रमुख सूत्रे व १३ उपसूत्रे लिहिली आहेत.

**प्र. : वैदिक गणित शिकण्याचे नक्की फायदे काय?**

**उत्तर :** या गणित शिकण्याचे अनेक फायदे आहेत. मुख्य फायदा म्हणजे हे गणित सहज सुलभ असल्याने ते मुलांना जवळचे वाटते. वेग व अचूकता वाढते. मुलांची तर्कशक्ती व कार्यशक्ती वाढवते.

**प्र. : याचा उपयोग कुठे होतो?**

**उत्तर :** अगदी शालेय जीवनापासून व्यावहारिक जीवनातही याचा उपयोग होतो. स्कॉलरशिप, सीईटी, जेईई, एमपीएससी, युपीएससी व बँकेच्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना हमखास याचा उपयोग होतो. तसेच जोपर्यंत स्मरणशक्ती चांगली आहे तोपर्यंत आपण याचा अनेक ठिकाणी वापर करू शकतो. अगदी गणितातील सुमार




विद्यार्थीदेखील हे गणित शिकून आत्मविश्वास मिळवू शकतो.

**प्र. : याचा शाळेमधे उपयोग करता येईल काय?**

**उत्तर :** हो नक्की. शाळेतील उत्तरांचा पडताळा वैदिक गणिताने घेता येतो. आपल्या परीक्षेतील कच्च्या कामाचा वेळ वाचतो. अनेक ठिकाणी पायरीने गणिते सोडवण्याची गरज नसते, त्या वेळी आपण उत्तरे तोंडीदेखील काढू शकतो.

**प्र. : हे गणित शिकण्यासाठी कमीतकमी व जास्तीतजास्त वयोमर्यादा काय आहे?**

**उत्तर :** इ ४थी पासून पुढे कोणतीही व्यक्ती हे गणित शिकू शकते. फक्त २ ते ९ पर्यंतचे पाढे पाठ असणे आवश्यक आहे.

**प्र. : या गणितामुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या निकालामधे काही फरक पडतो का?**

**उत्तर :** हो. निश्चितच पडतो. कमीतकमी १० ते १५ % गुण तो परीक्षेत जास्त मिळवू शकतो.

पण या गणिताबद्दल काही गैरसमजदेखील आहेत.....

वैदिक गणित शिकलो म्हणजे सर्वच उत्तरे तोंडी देता येतात असे नाही. काही गणिते ही कागदावरच सोडवावी लागतात. पण शाळेतील पारंपरिक पद्धतीपेक्षा नक्कीच खूप वेगाने व अचूकपणे हे गणित सोडवून इतरांना चकित करता येते. तसेच गणित कितीही सोपे असले तरी सराव हा आवश्यकच आहे. शिकण्याची इच्छाही हवी.

काय मग शिकणार ना वैदिक गणित?

ब्रह्मर्षि इन्स्टिट्यूटला नक्की भेट द्या व अधिक माहिती जाणून घ्या.....

vijaykulkarni15@yahoo.in

***



Om Prakashan
2nd Floor, Plot No. 8 Raghukul Society, Opp. Girijashankar Vihar, karve Nagar, Pune 411052,
Contact No. 81490 90765 / 72767 00766, Email : patrika.bvp@gmail.com